जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ४२५ दिनांक - १०/०६/२०२३**

## सामाजिक सुरक्षा विभाग,गुन्हे शाखा,पुणे शहर

### रात्री १०/०० वा.नंतर येरवडा परीसरात मोठया आवाजात साऊंड सिस्टीम लावुन संगीत वाजवणारे एलिफंट ॲन्ड को.रेस्टॉरंन्ट ॲण्ड बार,गौरीशंकर कल्याणी बंगलो सो.लेन नं.२ सेंट्रल ॲव्हेन्यु,निलांजली सोसायटी कल्याणीनगर,पुणे यांचेवर कारवाई करून त्यांचेकडील साऊंड सिस्टीम,डिजे मिक्सर जप्त.

दि.१०.०६.२०२३ रोजी रात्री २२/०० वा.नंतर येरवडा परीसरात मोठया आवाजात साऊंड सिस्टिम सुरू असलेबाबत सामाजिक सुरक्षा विभाग गुन्हे,शाखेकडील अधिकारी व पोलीस अमंलदार यांना माहिती मिळाली.

सदर ठिकाणी सामाजिक सुरक्षा विभागाचे अधिकरी व अंमलदार यांनी खात्री केली असता **एलिफंट ॲन्ड को.रेस्टॉरंन्ट ॲण्ड बार,गौरीशंकर कल्याणी बंगलो सो.लेन नं.२,सेंट्रल ॲव्हेन्यु,निलांजली सोसायटी कल्याणीनगर,पुणे** या हॉटेल मध्ये मोठया आवाजात संगित सुरू असल्याचे आढळल्याने,सदर हॉटेलवर कारवाई करून ४,००,०००/- रू किंमतीचे साऊंड सिस्टिम जप्त करण्यात आले असुन,पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ अंतर्गत ध्वनी प्रदुषण (विनियमन व नियंत्रण) अधिनियम २००० चा नियम ५ चा भंग केलेबद्दल कारवाई करण्यात आली आहे. त्यांचे कडुन जप्त केलेला मुद्देमाल (साऊंड सिस्टीम) येरवडा पोलीस स्टेशनच्या ताब्यात देण्यात आला आहे.

सदरची कारवाई मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार, मा.पोलीस सह आयुक्त,पुणे शहर,श्री.संदिप कर्णिक, मा.अपर पोलीस आयुक्त,गुन्हे,पुणे,श्री.रामनाथ पोकळे, मा.पोलीस उप आयुक्त,गुन्हे, श्री.अमोल झेंडे यांचे आदेश व मार्गदर्शनाखाली सामाजिक सुरक्षा विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक,भरत जाधव तसेच सहा.पोलीस निरीक्षक,अश्विनी पाटील, आनिकेत पोटे, पोलीस अंमलदार,अजय राणे, हनमंत कांबळे, अमेय रसाळ, अमित जमदाडे या पथकाने यशस्वी केली आहे.